# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी १८
## जाहिरात क्रमांक ३४७/२०२०
## वैद्यकीय अधिकारी भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

**१.पदसंख्या व आरक्षण**

| अ.क्र. | पदनाम | अ.जा. | अ.ज. | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | वि मा प्र | इ मा व | एस ई बी सी | ई डब्ल्यु एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | S.C. | S.T. | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | S.EBC | EWS | open | Total |
| १. | वैद्यकीय अधिकारी | १ | १ | - | - | - | - | - | ४ | २ | १ | ४ | १३ |

**२.शैक्षणिक अर्हता**

| | | |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. पदवी आवश्यक.<br>2) महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडील नोंदणी आवश्यक. |

**३.वेतनश्रेणी**

| | |
|---|---|
| ३.१ | सदर पदासाठी र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु.५४०० |

**४.वयोमर्यादा :-**

| | |
|---|---|
| ४.१ | सदर पदासाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील. |

**५.परिक्षा शुल्क**

| | |
|---|---|
| ५.१ | मागासवर्गातील उमेदवारांनी र.रु.१५०/- व अमागास/खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.३००/- याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. वर नमूद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क online payment पद्धतीने करण्यात यावे त्याकरीता उमेदवारांनी सादर करावयाचे online अर्जासोबत सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. इतर स्वरुपात प्राप्त होणारे परीक्षा शुल्क स्वीकारले जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. विहीत शुल्क न भरल्यास अर्ज अपात्र करणेत येईल. |

**६. Online अर्ज करण्याची अंतिम मुदत-** दिनांक २०/०५ /२०२० रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील.

**७. पदाची कर्तव्य व जबाबदा-या –**

| | |
|---|---|
| ७.१ | भारतीय वैद्यकीय परिषदेच्या निकषानुसार वैद्यकीय व रुग्णालयीन सेवा याप्रकारचे नेमूण दिलेले कामकाज व संबंधित अन्य कामकाज करणे बंधनकारक राहील. |
| ७.२ | निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालयात/दवाखान्यात/पोस्ट मार्टेम सेंटर येथे आवश्यकतेनुसार करण्यात येईल. |

**८. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

| | |
|---|---|
| ८.१ | उमेदवारांनी विहित नमुन्यातील Online अर्ज भरण्यापूर्वी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर जाहिरात अभ्यासावी. भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने Online अर्ज भरुन सादर करावा. |
| ८.२ | विहित नमुन्यातील अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. |
| ८.३ | माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील. |
| ८.४ | अर्ज मराठी मध्ये उपलब्ध करुन देणेत आला आहे. उमेदवाराने त्याप्रमाणे मराठीमध्ये अथवा इंग्रजीमध्ये (CAPITAL LETTER) संपूर्ण माहिती भरावी. |
| ८.५ | अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे. प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे |

| | |
|---|---|
| | अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना असतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. |
| ८.६ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अपंग, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादि संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केले नंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| ८.७ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. |
| ८.८ | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. एम.बी.बी.एस. परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल. |

**९. निवड पध्दती :-**

| | |
|---|---|
| ९.१ | पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने यापुर्वी जाहिरात क्र.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ अन्वये वैद्यकीय अधिकारी या पदासाठी प्रसिध्द केलेल्या अटी-शर्तीनुसार ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्या उमेदवारांपैकी ज्यांनी मनपाचे ई-मेलनुसार परिपुर्ण कागदपत्रे सादर केलेली आहेत त्या सर्व पात्र उमेदवारांची Online Application number यादी या जाहिरातीसोबत मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे त्या उमेदवारांनी पुनश्च सदरचे जाहिरीतीनुसार नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही त्यांचे यापुर्वीचे अर्ज व कागदपत्रे वैद्यकीय अधिकारी पदाचे भरतीसाठी ग्राह्य धरण्यात आलेली आहेत. |
| ९.२ | वैद्यकीय अधिकारी पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन अशा उमेदवारांची लेखी परीक्षा अथवा मौखिक मुलाखती किंवा उमेदवारांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता व त्यामध्ये प्राप्त केलेले अंतिम गुण,अनुभव कालावधी ,उत्तीर्ण वर्ष इत्यादी बाबी पडताळणी करुन निवड प्रक्रिया राबविण्याचा अंतिम निर्णय हा मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा राहिल. वरीलपैकी नेमणुकीकरीता कोणती कार्यपद्धती अवलंबण्यात येईल याचा निर्णय उमेदवारांना मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल तसेच याकरीता अर्ज केलेले उमेदवारांना स्वतंत्र पत्रव्यवहार करणेत येणार नाही. |
| ९.३ | उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना राहील. |
| ९.४ | समान गुण असणा-या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रनिम/२००७ /प्र.क्र. ४६/७/१३ अ, दि. २७/०६/२००८ मधील मुद्दा क्र.६ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल. |
| ९.५ | निवड यादी व प्रतिक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ९.६ | भरतीबाबत लेखी परीक्षा किंवा मौखिक मुलाखत किंवा उपरोक्त ९.१ येथे उल्लेख केलेप्रमाणे कार्यवाहीबाबत उमेदवाराने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील अद्ययावत (Updates) माहिती पाहणे आवश्यक आहे. |

**१०. सामाजिक व समांतर आरक्षणाबाबत :-**

| | |
|---|---|
| १०.१ | वैद्यकीय अधिकारी या पदनामाचे प्रवर्गनिहाय आरक्षणामध्ये इ.मा व. एस.ई.बी.सी.व खुला प्रवर्गाकरीता प्रत्येकी १ पदाचे आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते महिलांसाठी राखीव आहे. तसेच खुला प्रवर्गामध्ये ०१ दिव्यांग(अस्थिव्यंग) आरक्षण आहे. |
| १०.२ | जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग, विशेष मागास वर्ग,एसईबीसी,ईडब्ल्यूएस (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १०.३ | उमेदवाराने अर्जामध्ये जातीचा व जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. |
| १०.४ | विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता (एसईबीसी), ईडब्ल्युएस करीता दावा करणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १०.५ | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे शासनाने जाहिर केलेल्या सक्षम अधिका-याचे **दि. ३१/०३/२०२०** पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल. सदर प्रमाणपत्र सादर न करु शकणारे उमेदवार समांतर तसेच मागासप्रवर्गातील आरक्षणाचा (सामाजिक आरक्षण) लाभ घेण्यास अपात्र होतील. |
| १०.६ | सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, जोडणे आवश्यक राहील. |
| १०.७ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, |

| | |
|---|---|
| | क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ. दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. |
| १०.८ | इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही. सदर आरक्षण विषयक नियम हे केवळ महाराष्ट्र राज्यात अधिवास करणा-या उमेदवारांनाच लागू आहे. त्याकरीता उमेदवाराने अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |
| १०.९ | विवाहित स्त्रीयांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले राजपत्र संबंधित उमेदवारांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| १०.१० | खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या महिला उमेदवारांनी त्या नॉनक्रिमीलेअर प्रवर्गातील महिला असणे आवश्यक आहे. |
| १०.११ | फक्त कायम स्वरुपाचे दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांनाच दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचे व आरक्षणांचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेवारांना दिव्यांग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत. |
| १०.१२ | दिव्यांग व्यक्तींसाठी नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्यापदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर दिव्यांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करुन घेण्यात येईल. |
| १०.१३ | नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग) व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या सवलतींचा लाभ मिळण्यासाठी मा.जिल्हा शल्य चिकित्सकांकडील नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग)चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग) प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. |
| १०.१४ | **जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदसंख्येत/आरक्षणात बदल होऊ शकतो.तसेच मागासवर्गीय आरक्षण व एसईबीसी,ईडब्ल्युएस आरक्षण यांचे बिंदुनामावली याबाबत भविष्यात शासन निर्णय पारीत झाल्यास त्यानुसार जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.** |

## ११. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/सूचना :-

| | |
|---|---|
| ११.१ | पात्रता/आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही. |
| ११.२ | महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडील नोंदणी अथवाअद्ययावत नुतणीकरण केल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे किंवा कौन्सीलकडे नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची/पावती आवश्यक आहे. |
| ११.३ | उमेदवारांना मुलाखतीचा/लेखी परीक्षेचा जो निर्णय होईल त्याप्रमाणे पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा सूची व इतर सर्व सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणात्सव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. |
| ११.४ | उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतची शासनाने विहित केलेली अर्हता धारण केलेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ११.५ | उमेदवारास मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने उमेदवार १०० गुणांचा मराठी विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असावा तथापि,त्याप्रमाणे नसल्यास त्याने मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा नियुक्तीपासुन २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे सदर परीक्षा उत्तीर्ण होई पर्यंत उमेदवाराची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असेल तसेच त्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येणार नाही परंतु २ वर्षात मराठी भाषेची सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यास वार्षिक वेतनवाढ पूर्वलक्षी प्रभावाने लागू होईल.मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ११.६ | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्ती योजना (Defined contribution Pension System) लागु राहील. |
| ११.७ | महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| ११.८ | गट 'ब' मधील सदर पदावर अंतिम निवड झाल्यावर उमेदवाराची मा. जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल. |

| | |
|---|---|
| ११.९ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| ११.१० | निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर महापालिकेचे सेवानियम महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार लागू होतील. |
| ११.११ | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही. |
| ११.१२ | निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व दोन वर्षानंतरचे सेवासातत्य, परिविक्षाधीन कालावधीबाबत अलहिदा स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल. |
| ११.१३ | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांनी विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादि विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही. |
| ११.१४ | निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व लेखी परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे.तसेच भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी. निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल. |
| ११.१५ | पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल. |
| ११.१६ | रिक्त पदांचे आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत. |
| ११.१७ | प्रमाणपत्र पडताळणी — उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसुचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल. विहित कागदपत्रे सादर करु न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच,त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदर्भातील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. |

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

सहाय्यक आयुक्त,प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018
जाहिरात क्र.73/2019 अन्वये वैद्यकीय अधिकारी पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी अर्ज पात्र झालेल्या उमेदवारांचे
Online Application Number

| Sr.No. | Online Application No. |
|---|---|
| 1 | 1018 |
| 2 | 1038 |
| 3 | 1060 |
| 4 | 1068 |
| 5 | 1078 |
| 6 | 1110 |
| 7 | 1127 |
| 8 | 1137 |
| 9 | 1215 |
| 10 | 1267 |
| 11 | 1302 |
| 12 | 1311 |
| 13 | 1322 |
| 14 | 1331 |
| 15 | 1353 |
| 16 | 1399 |
| 17 | 1427 |
| 18 | 1431 |
| 19 | 1451 |
| 20 | 1469 |
| 21 | 1478 |
| 22 | 1481 |
| 23 | 1506 |
| 24 | 1516 |
| 25 | 1525 |
| 26 | 1526 |
| 27 | 1541 |
| 28 | 1562 |
| 29 | 1572 |
| 30 | 1606 |
| 31 | 1647 |
| 32 | 1654 |
| 33 | 1657 |
| 34 | 1660 |
| 35 | 1661 |
| 36 | 1675 |
| 37 | 1679 |
| 38 | 1683 |
| 39 | 1691 |

सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411018